# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३.०९.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०९) इतिवृत्त**

बुधवार दिनांक १३ सप्टेंबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.१५ वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

<u>संवाद :</u>

श्री.कंवरसिंग बैनाडे : मागील स्थायी समिती सभेमध्ये मा.आयुक्तांनी खुलासा केला होता की, या महिन्यात सिडको नाट्यगृहाचे टेंडर निघेल. नेमकी काय परिस्थिती आहे याबद्दल माहिती देण्यात यावी.

सौ. लता दलाल : चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या कामांचे अंदाजपत्रक झालेले आहे काय? पंधरा दिवसात सर्व अंदाजपत्रके करणार होते. दारिद्रय रेषेखालील सर्वेक्षण किती टक्के झाले? आमच्याकडे लोक सर्वेक्षणासाठी आलेले नाहीत. १६ तारखेपर्यंत मुदत वाढविण्यात आलेली आहे. या मुदतीत सर्व्हेसाठी कर्मचारी यायला पाहिजे होते परंतु अद्याप आलेले नाहीत. सर्वच स.सदस्यांची मागणी आहे, कर्मचारी सर्वेक्षणाला आले नाही. याबद्दल सत्य परिस्थिती काय आहे तसेच अंदाजपत्रका संदर्भात खुलासा देखील करण्यात यावा.

श्री.अजिजजहागिरदार : प्रभाग समिती सभेत दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणाबाबत मी प्रश्न उपस्थित केला होता. त्या सभेत मला माहिती देण्यात आली होती की, माझ्या प्रभागात श्री.सुरडकर नांवाचे कर्मचारी काम करतात. परंतु हे सुरडकर कोण आहेत, त्यांचा हुद्दा काय याबद्दल काहीच माहिती नाही.

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | : स्थायी समिती सभेत विविध प्रश्न आणि माहिती विचारल्यानंतर पुढील सभेत अहवाल देण्यात येईल, पुढच्या सभेत माहिती देऊ अशी विधाने करण्यात आलेली आहेत. परंतु आजपर्यंत एकाही विषयावर कार्यवाही झालेली नाही. प्रथम खुलासा झाल्याशिवाय विषयपत्रिका सुरू करू नये अशी सभागृहास विनंती आहे. |
| कार्य.अभि.(ड्रे.वि.इ.) | : सिडको प्राधिकरणाने नाट्यगृहासाठी दोन एकर भूखंड राखीव ठेवलेला आहे. या संदर्भात १९९९ पासून पत्रव्यवहार चालू आहे. नाट्यगृहाचे बांधकामासाठी मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांनी त्यांच्या स्वेच्छानिधीमधून २ कोटी रूपये देण्याचे आश्वासन दिले आहे. कालच मा.खासदार साहेबांची भेट घेतली. त्यांचेकडून पत्र प्राप्त झालेले आहे. २ वर्षासाठी प्रत्येक वर्षी १ कोटी याप्रमाणे खर्च करावे लागेल. त्यांनी मा.जिल्हाधिकारी यांना पत्र दिले आहे. संबंधीत वास्तुशास्त्रज्ञाशी बोलणे झाले. या आठवड्यात अंदाजपत्रक पूर्ण होईल. तसेच या आठवड्यात बैठक लावण्याबाबत मा.खासदारांनी सूचना केलेल्या आहेत. नुकतेच शासनाचे पत्र आलेले आहे व सिडकोलाही पत्र आले आहे की, महानगरपालिकेस विना मोबदला जगेचे हस्तांतर करावे. या आठवड्यात त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. |
| मा. सभापती | : |
| श्री.कंवरसिंग बैनाडे | : मा. आयुक्त यांनी सांगितले होते या महिन्यात निविदा निघेल. २ कोटीचे पत्र मिळाले. पुढे काय कार्यवाही करणार. निविदा काढावी व काम सुरू करावे. |
| मा. सभापती | : कार्यकारी अभियंता यांचेकडून अपेक्षित असलेला खुलासा झालेला नाही. मा. आयुक्तांनी खुलासा करावा. |
| मा. आयुक्त | : महाराष्ट्र शासनाचेआदेश प्राप्त झाले आहेत की नाट्यगृहाची जगा ताब्यात घ्यावी. शासन १ कोटी देणार, सिडकोने २५ लाख परत केलेले आहेत. या कामास सुमारे ६ कोटी १० लाख खर्च अपेक्षित आहे. मा. विभागीय आयुक्त यांनी बैठक बोलावली होती. या संदर्भात महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केलेले आहे. १ कोटी महानगरपालिकेतर्फे उरलेले ४ कोटीपैकी २ कोटी मा.खासदार यांचेकडून उपलब्ध होतील. त्यासाठी विशेष परवानगी घ्यावी लागेल. उर्वरीत २ कोटी मा.आमदार, महाराष्ट्र शासन यांच्याकडे मागणी करण्यात येईल. आता १ कोटी शासनाचे, २५ लाख सिडकोकडून मिळालेले एवढीच रक्कम आहे. मा. खासदार राजकुमारजे धुत यांचे निधी संदर्भात कार्यवाही सुरू होऊ द्या. जिल्हाधिकारी यांनी पत्र दाखवले आणि त्यांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून विशेष परवानगी घ्यावी लागेल. निविदा काढल्या तर पैसे खर्च करणे भाग पडेल. केंद्र शासनाने जर मंजुरी दिली नाही तर आपण खर्च करू शकू का? नाट्यगृहाची जगा ताब्यात घेण्याचे आदेश आहेत. ५ कोटी खर्च करता येईल का, द्विधा मन:स्थिती आहे. ४-५ कोटी अर्थसंकल्पात तरतुद करणे, प्रशासन द्विधा मन:स्थितीत आहे घ्यावे की नाही. |
| श्री.कंवरसिंग बैनाडे | : पालिका आयुक्त सक्षम आहेत. आपल्या कालावधीत नाट्यगृह व्हावे. आपण सौंदर्यीकरणावर खर्च करतो, पाण्याच्या टाक्यावर १ ते १.२५ कोटी खर्च करतो तर नाट्यगृहावर का नाही? महानगरपालिका सक्षम आहे. दोन वर्षात करावे. मा. खासदारांनी दिले नाही तर होणार नाही का, यासाठी आपण सक्षम आहोत. |

मा. सभापती : मा. आयुक्त व कार्यकारी अभियंता यांनी नाट्यगृहासंबंधी खुलासा केला व माहिती दिली. महानगरपालिकेस ६ कोटी खर्च करता येईल का, याबद्दल प्रशासन द्विधा मन:स्थितीत आहे असा प्रशासनाने खुलासा केला आहे. मा.उच्च न्यायालयात मनपातर्फे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सिडको येथे नाट्यगृह बांधण्याची जबाबदारी मनपा घेत आहे व महानगरपालिकेतर्फे नाट्यगृह बांधण्यात येईल असे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यावेळी प्रशासनाला ५-६ कोटी लागणार याची कल्पना नव्हती का? दोन वर्षे कार्यवाही करत नसाल तर मा.उच्च न्यायालयाचा सन्मान राहिला पाहिजे. सर्वसाधारण सभा व स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : बी.ओ.टी.पध्दतीवर करता येईल किंवा कसे ते पाहावे.

मा. सभापती : दोन्ही सभागृहाने मान्यता दिलेली आहे. आता प्रशासन द्विधा मन:स्थितीत आहे.

मा. आयुक्त : आपण बांधणारच. मा.उच्च न्यायालयामध्ये केलेले स्टेटमेंट पाळणारच. आता टेंडर काढून डिसेंबर पर्यंत ५ कोटी किंवा त्यापेक्षा जस्तही वाढेल. निविदा प्रक्रीया चालू होईल. मुद्दा आहे फक्त बांधायचे आज किंवा उद्या. मंत्रीमंडळाचे बैठकीत अर्थसहाय्य मिळणारच आहे.

मा. सभापती : हे सभागृह या निर्णयाप्रत आले आहे की, महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात शपथपत्र सादर करून जबाबदारी घेतली. राज्य शासनाचेही आदेश आहेत. सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेची मान्यता आहे. खासदार निधीतून २ कोटी मिळणार आहेत. लोकप्रतिनिधींना या सर्व बाबींची कल्पना आहे. खासदार निधीच्या संदर्भातील संहिता मा.आयुक्तांना माहिती आहे. खासदार निधी मिळाला तर आनंदच आहे. एक तर निधी शिल्लक आहे का हे पहावे लागेल. वस्तुस्थितीपासून दूर जऊ नये. निधी आला तर स्वागत अन्यथा उपलब्ध झाले नाही तर संहिता नियमावलीत बदल करावा लागेल असे माझे मत आहे. स्थायी समिती असे आदेशित करते की, निधी आला तर स्वागत नाही आले तरी सिडको येथील नाट्यगृह बांधण्यास महानगरपालिका सक्षम आहे. यावर्षी १.२५ कोटी उपलब्ध आहेत. मंत्रीमंडळाचे बैठकीपुर्वी निविदेची कार्यवाही व्हावी. पुढील वर्षाचे अर्थसंकल्पही याच सभागृहासमोर येणार आहे. या कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. स्थायी समितीच्या आदेशाचे पालन करावे.

मा. आयुक्त : निविदापुर्वी स्थायी समितीसमोर यावे लागेल.

मा. सभापती : अर्थसंकल्प मंजूर होऊन बराच कालावधी झालेला आहे. कामाला कधी सुरूवात होणार आहे. विकास कामासाठी अंदाजपत्रकात किती तरतुद केलेली आहे, सध्या कामे काणत्या स्तरावर आहेत सर्व कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी.

श्री.अजिजजहागिरदार : अर्थसंकल्पामध्ये क्रमांक १९ वर नवीन खडीकरण गोलवाडी झालेले आहे ते दुरूस्त करून बनेवाडी करण्यात यावे.

मा. सभापती : छपाईतील चुक आहे ती दुरूस्त करण्यात यावी.

अति.श.अभियंता : अतिरिक्त शहर अभियंता विभागासाठी सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरीकरण, खडीकरण, काँक्रीट रस्ते, पुनर्डांबरीकरण, प्रशासकीय इमारत इ. सुमारे ३०० कामे आहेत. यापैकी १०० अंदाजपत्रके तयार करून मंजुरीसाठी पाठविलेली आहेत. १०० कामासाठी २ कोटी ४० लक्ष रक्कम खर्च होईल.

मा. सभापती : आपल्या विभागाला किती कोटीची मान्यता आहे, काम किती दिवसात होईल, निविदा कधी निघेल?

अति.शहर अभियंता : १७ लेखाशिर्ष आहेत व त्याची रक्कम सुमारे १६.६४ कोटी येते. १/३ मंजुरीसाठी पाठवले आठ दिवस लागतील. २.४० कोटीची कामे मंजुरीच्या स्तरावर आहेत. अंदाजपत्रके तयार करण्याचे काम जेमाने चालू आहे.

सौ. लता दलाल : स्थायी समितीमध्ये सूचना देण्यात आल्या होत्या की १५ दिवसात अंदाजपत्रके तयार असावीत. ३०० पैकी १०० तयार आहेत. २० दिवसाला १०० याप्रमाणे संपूर्ण अंदाजपत्रके तयार होण्यास दोन महिने लागतील. अंदाजपत्रके तयार करणे, मंजूर करणे, निविदा प्रसिध्दीस देणे, निविदा मान्य करणे व इतर आवश्यक कार्यवाहीसाठी ४ महिने जतील. किती कालावधी जईल. आम्हाला लोकांसमोर जयचे आहे या वर्षात यापेक्षा जेमाने कामे झाली पाहिजेत अशी अपेक्षा आहे.

श्री. रेणुकादास वैद्य : माझी एक सूचना आहे, आपल्या संचिका कारण नसतांना आठ टेबलावर जतात. हे कमी करण्यात यावे.

श्री.अजिजजहागिरदार : जेथे आवश्यक आहे तेथेच जऊ द्यावे, आठ - आठ टेबलावर जण्याची आवश्यकता नाही. काम पूर्ण झाले, बील झाले, सरळ चेक डिपार्टमेंटला जयला पाहिजे पुन्हा पुन्हा लेखा विभागाकडे जण्याची आवश्यकता नाही. लेखा विभागाकडून शेरा येतो चर्चा करा. बजेट खतावणीनंतर लेखा विभागाकडे पुन्हा का जतात? कुणी अधिकार दिले? चर्चेला कार्यकारी अभियंता जतात. अद्याक्षरी झाल्याशिवाय चेक निघत नाही. टेबल कमी करावेत.

मा. सभापती : अंतिम करतांना अर्थसंकल्पीय तरतुदी पाहण्यात येते.

कार्य.अभि.(पा.पु.) : पाणी पुरवठा विभागासाठी १४.७३ कोटीची तरतुद आहे व त्यात १९९ कामांचा समावेश आहे. पैकी ५१ कामांची अंदाजपत्रके मंजुरीच्या स्तरावर आहेत. त्याची रक्कम सुमारे ३ कोटी येईल. सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील दरसूची (डी.एस.आर.) २५ ते ३०% वाढला आहे. नवीन डीएसआर छपाई होत आहे. आजमिळण्याची शक्यता आहे.

कार्य.अभि.(ड्रे.वि.इ.) : ड्रेनेज, लाईट, इमारती व उद्याने यासाठी ५९७ कामांचा अर्थसंकल्पात समावेश आहे. ६४ कामांचे अंदाजपत्रक वरीष्ठांकडे सादर झालेली आहेत. त्याची रक्कम सुमारे ३ कोटी येईल. अर्थसंकल्पात या विभागासाठी सुमारे १५ कोटीची तरतुद असून लहान लहान कामे मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे वेळ लागतो. उर्वरीत कामाचे अंदाजपत्रकासाठी सुमारे दीड ते दोन महिने लागतील. ३ हजराचे किंवा ३ लाखाचे अंदाजपत्रकासाठी तेवढाच वेळ लागतो. सर्वेक्षण करणे, मोजमाप करणे, आकडेमोड करणे यासाठी वेळ लागतो.

मा. सभापती : सहा प्रभाग कार्यालयात सर्व तांत्रिक कर्मचारी वर्ग झालेला आहे. त्यांना देखील वेळेचे बंधन आहे. त्यांनी सक्षमतेने लवकरात लवकर कामे करावीत. आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांकडून जस्त काम करून घ्यावे.

सौ. लता दलाल : मागच्या बैठकीत विद्युत खाजगीकरणा संदर्भात चर्चा झाली होती. त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येणार होते. या कामासाठी वार्ड इंजिनिअर, ज्यु.इंजि, सब ओव्हरसिअर यांचे सहकार्य घ्यावे. कामे लवकर होतील त्यांचेकडून अंदाजपत्रक करून घ्यावे.

| | |
|---|---|
| मा. सभापती | : अधिक्षक अभियंता यांनी कामाकडे थोडे लक्ष देण्याची गरजआहे. कार्यकारी अभियंता यांनी सक्षमतेने कामाला लागावे. यावर्षी कामे अपूर्ण न राहता (स्पील ओव्हर) संपूर्ण खर्च होईल अशी अपेक्षा आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : माझी एक सूचना आहे अंदाजपत्रकासाठी जे वेळ लागणार आहे तो वेळ शेवटचे अंदाजपत्रकासाठी लागावे. आजच्या किंवा पहिल्या अंदाजपत्रकासाठी नाही. |
| मा. सभापती | : दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणा संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. प्रकल्प संचालक सुटीवर आहेत. विभाग प्रमुख उप आयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा. सहा प्रभाग कार्यालया अंतर्गत कामाची सद्य:स्थिती काय आहे, याला जबाबदार कोण आहे, पालिका सदस्यांच्या संपर्कात किती कर्मचारी आलेले आहेत? इ. संपूर्ण माहिती देण्यात यावी. |
| उप आयुक्त (प्र.) | : शासनाचे आदेशानुसार ५३ घोषीत झोपडपट्ट्या व ९४ दारिद्र्य रेषेखालील वसाहती या भागात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षणाचे काम चालू केले. संबंधीत वॉर्ड अधिकारी क्षेत्रिय अधिकारी असून त्यांच्या हाताखाली वरीष्ठ लिपिक हे पर्यवेक्षक व त्यांच्या हाताखाली प्रगणक अशी रचना आहे. याची सविस्तर टिपणी मा.सभापती यांना दिली आहे. ४२% सर्वेक्षण पूर्ण झालेले असून जे भाग राहीलेला असेल तो प्रगणक यांच्या बदल्यामूळे राहीला. त्यामुळे काम थांबले होते. सर्वांना सूचना दिलेल्या आहेत, सर्वेक्षणातून एकही कुटूंब राहू नयेत. या संदर्भात मा.आयुक्त आजच सभा घेणार आहेत. १५ सप्टेबंर पर्यंत मुदत वाढीसाठी शासनाकडे विनंती करण्यांत येईल. |
| श्री.विसपुते शंशाक | : माझ्या भागात दारीद्रय रेषेखालील कुटूबांची संख्या जस्त आहे. मी,पुन्हा पत्र दिलेले आहे. ४२% काम झालेले आहे म्हणतात, परंतु प्रत्यक्षात झाले नाही. १५ तारखेपर्यंत सर्वेक्षण कसे होईल. |
| श्री.वैद्य रेणुकादास | : या संदर्भात वॉर्ड अधिकारी यांनी एकदाही कल्पना दिलेली नाही. |
| श्री.जगीरदार अजीज | : शासनाने मुदतवाढ दिली नाही तर, याची जबाबदारी कोणावर राहील. |
| श्री.पांडे विनायक | : झोपडपट्ट्यामध्ये आर्थिक दुर्बल घटकाचे लोक राहतात व झोपडपट्ट्यामध्येच सर्वे होणार असे सांगण्यात आले, उर्वरीत प्रभागात सर्वे करणार नाही का? |
| उपआयुक्त (प्र.) | : झोपडपट्ट्यामध्ये होणार, त्याचप्रमाणे उच्चभ्रु वस्तीत देखील सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. |
| श्री.जगीरदार अजीज | : ४२% काम झाले, ५८% दोन दिवसात कसे करणार? जे शंभर रूपये देतो, त्याचा सर्वे होतो, जेदेत नाही त्याचा सर्वे होत नाही. असा माझा आरोप आहे. |
| श्री.पांडे विनायक | : भावसिंगपुरा भागात फक्त दोन-चार घरातच कर्मचारी गेले होते. ही सर्वेक्षणाची कोणती पध्दत आहे. |
| सौ.दलाल लता | : दुसऱ्यांना मुदत वाढवून आली, तीसऱ्यांदा देखील मुदत वाढणार. सर्वेक्षणातून वंचीत राहीले तर याला जबाबदार कोण? आजदारीद्रय रेषेखालील कुटूंबाना कार्ड मिळाले तर सवलती मिळतात, त्यामूळे महत्व प्राप्त झालेले आहे. कार्ड नसेल तर रॉकेल,धान्य व औषधी मिळत नाही. |
| मा.सभापती | : स.सदस्यांच्या तीव्र भावना झालेल्या आहे. दारीद्रय रेषेखालील कुटूंबाना कार्ड मिळायला हवे. सदर व्यक्ती कोणत्याही प्रभागात राहणारी असो. त्यांच्यावर अन्याय होवू नये, ही सभागृहाची भावना आहे. प्रशासनाने गांभीर्याने ही बाब घेतलेली नाही. १५ सप्टेबंर पर्यंत मुदतवाढ मागणार, आज४२% सर्वे झालेला |

आहे. ५८% राहीला तो दोन दिवसात होणार नाही. झालेला सर्वे देखील बरोबर झालेला नाही असे वाटते. कोणत्याही व्यक्तीवर गदा येणार नाही, याची दखल घ्यावी. आठ दिवसात मुदतवाढीच्या संदर्भात काम कसे करणार, याबद्दल उपआयुक्त (प्र.) यांनी कोणत्या पध्दतीचा अवलंब केला, याची माहिती देण्यांत यावी.

श्री.वैद्य रेणुकादास : पैठणगेट येथील वाहनतळालगत ज्युस सेंटरची जगा महापालिकेने भाडेपट्ट्याने दिली आहे. त्याबद्दल माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती : यानंतर प्रत्येक मंगळवारी सकाळी ११ ते २ या कालावधीत स्थायी समितीची साप्ताहीक सभा आयोजीत करणे बाबत निर्णय घेण्यात येत आहे. सभेसाठी काही प्रश्न असतील तर एक दिवस अगोदर सभापती यांचेकडे देण्यांत यावे.

सौ.दलाल लता : मागील चार-पाच सभेमध्ये असेच घडत आहे की, विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा होत नाही. जर खुलासा होणार नसेल तर, आम्ही यापुढे येणार नाही. अतिक्रमणा बाबत,अनधिकृत बांधकामा बाबत,वाहनतळा बाबत,विविध बांधकाम परवानगीच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे येत नाही.

मा.सभापती : नगर रचना विभाग,प्रशासकीय अधिकारी तसेच करमुल्य निर्धारण अधिकारी यांना आताच सूचना देण्यात येते की, त्यांच्या विभागावर पुढच्या बैठकीत चर्चा होईल. स.सदस्यांना सूचना करण्यांत येतेकी, सभापती यांचेकडे प्रश्नांची एक प्रत द्यावी व पूर्व तयारीच्या संदर्भात एक प्रत मा.आयुक्त यांना देण्यांत यावी.

श्री.जगीरदार अजीज : पत्रकार परिषद घेवून ५० हजर मालमत्तांचा सर्वे होवून त्यांना नोटीसा देवून कर वसूल करण्याच्या संदर्भात स्पेक कंपनीने कार्यवाही केली. परंतु त्यांची मुदतवाढ संपलेली आहे. मुदतवाढ दिली नाही तर नोटीस कोण बजवतील? गैर कायदेशिररित्या काम करतात, सर्व बाबींचा खुलासा व्हावा.

श्री.नाहदी नासेर : प्रश्न अत्यंत महत्वाचे आहे, खुलासे मागविण्यात आले, मा.सभापतींनी रूलींगही दिली,आठ दिवसांत माहिती देण्यांत येईल असे सांगण्यात येते, परंतु महिनो गणती माहिती मिळत नाही. अनेक सदस्यांनी अनेक प्रश्न विचारलेले आहे, आजपर्यंत एकही खुलासा झालेला नाही.

श्री.गायकवाड दिलीप : जकात विभागातील कर्मचाऱ्यांना निलंबीत केले होते, त्यांना पुन्हा सोने,चांदीच्या जकात वसुलीवर नेमण्यात आले.

श्री.दाभाडे मिलींद : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मुख्य गेट समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ब्राँझच्या पुतळ्याचे पापुद्रे निघाले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला होता, तेथील जमावाला आम्ही शांत केले. याबद्दल महापालिका प्रशासनाला जब विचारायला पाहीजे संबंधीत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही व्हावी. या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व आवश्यक ती डागडुजेची कामे तातडीने करून घ्यावी. व या संदर्भात अहवाल देण्यांत यावा.

अति.शहर अभियंता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सुमारे आठ ते दहा वर्षे झालेली आहे. सदर पुतळा ब्राँझचा असून, काल जे प्रकार घडला तो सतत पावसामुळे काही ठिकाणी पॉलीश निघाली. प्रशासनाने त्या बाबीची दखल घेतलेली आहे. त्याठिकाणी उपआयुक्त व मी,स्वत: होतो. सकाळी आठ वाजेपासून काम सुरू केले आहे. आवश्यक ती दक्षता घेतली आहे. व दुरूस्तीचे काम केलेले आहे.

श्री.जगीरदार अजीज : दिनांक ०७.०६.२००५ रोजे अजिंठा नाक्यावर संबंधीत नाका कारकुन यांनी पावती क्रमांक २९७८४९६६५ प्रमाणे तेजमान पत्ता आलेला होता. ७.७० लाखाची किमंत असून १.५ लाखाची पावती दिलेली आहे. यासंदर्भात कार्यवाही केली का? भरत बिरारे यांच्यावर काय कार्यवाही केली. श्री.रामटेके व श्री.उस्मान यांना निलंबीत केले. त्यांचेही निलंबन मागे घेण्यात यावे. ठेकेदाराचे चेक बाऊंस झाले कार्यवाही का थांबली? प्रत्येक नाक्यावर असेच कारकुन आहे.

मा.सभापती : उपआयुक्त (म.) यांनी लेखी स्वरूपात माहिती द्यावी. सर्वांना समान व एका नियमाखाली सारखे नियम लावावेत. जवळची व दूरची भावना नसावी.

**विषय क्र. ५४ :**

दिनांक २०/७/२००५ (का.प.क्र.६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २०/७/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५५ :**

(दि.२४-८-२००५ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ४३)

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोकणवाडी वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात रू.३,७३,४१३/- ची तरतूद करण्यात आली होती व सदर काम श्री.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.७८६% कमी दराची निविदा मंजूर करण्यात आलेली होती व त्याप्रमाणे एल.के.कन्स्ट्रक्शन यांनी काम केलेले आहे.

वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरणाचे काम करीत असतांना परिस्थितीनुरूप सौंदर्यीकरणाचे काम चांगल्या पध्दतीने होण्यासाठी, मुळ अंदाजपत्रकात वाहतुक बेट सौंदर्यीकरणासाठी ठेवलेल्या तरतुदी कमी व त्रोटक स्वरूपाच्या असल्याने ठेवलेल्या तरतुदीमधून संपूर्ण बेटाचे सौंदर्यीकरण करणे शक्य नव्हते. तसेच काम चालू असतांना तत्कालीन मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांनी कामास भेट दिलेली असून त्यांनीही सौंदर्यीकरणाचे काम चांगले होण्यासाठी काही तोंडी सूचना केल्या. त्यानुसार अतिरिक्त बाबी कराव्या लागलेल्या आहेत व सदर अतिरिक्त बाबीस रू.३,७०,०४०/- एवढा वाढीव खर्च झालेला आहे. दिनांक २७.१.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये वॉर्ड क्र.३३ कोकणवाडी चौकाचे सुशोभिकरण करणे या करीता रू.८.०० लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करून देण्यास मंजूरी दिलेली आहे.

तरी सौंदर्यीकरणाच्या कामा अंतर्गतआवश्यक असलेल्या रू.३,७०,०४०/- च्या अतिरिक्त बाबीसह (एँीर खींशाी) कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रू.७,४३,४५३/- मंजूरी मिळणे करीता सादर.

**संवाद :**

श्री.बैनाडे कंवरसिंग : मागच्या १५ दिवसापुर्वीच प्रस्ताव आला होता, त्यावेळेस मंजूरी दिलेली नाही. दरसूची प्रमाणे रक्कम काढत नाही का. करारनामा करून घेत नाही का? वाढीव रक्कम का देण्यांत येते.

श्री.जगीरदार अजीज : मा.महापौर,उपमहापौर,सभागृह नेता,विरोधी पक्षनेता यांनी तोंडी सांगितले आणि तुम्ही काम केले. बनेवाडी येथील एका कामाच्या २१% अंदाजपत्रका पेक्षा जस्त रक्कमेचे निविदेला मान्यता दिली नाही. मा.मुख्यमंत्री यांनी तीन महिन्यात पाईप लाईन करून देतो असे आश्वासन दिले होते. तोंडी आदेशावरून कामे करण्यात येतात.

मा.सभापती : मा.मुख्यमंत्री यांच्या सूचना आहेत की आश्वासन दिलेले आहे?

श्री.जगीरदार अजीज : बनेवाडी व इतर काही कामा संदर्भात फेर निविदा करणेबाबत स्थायी समितीने निर्णय दिला.

अति.शहर अभियंता : कोकणवाडी येथील वाहतुक बेट च्या कामाचे सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात रू.४.०० लाखाची तरतुद ठेवण्यात आली आहे. या कामाचे ३.७३ लाखाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. यात मोजक्या बाबींचा समावेश करण्यांत आला होता. प्रत्यक्षात काम करतांना काही अतिरिक्त बाबी कराव्या लागतात. असे स्थायी समितीचे स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांनी आग्रह धरला. Extra Items ॲटमची यादी करून कामाच्या ठिकाणी भेट दिली. मा.सभापती,स्थायी समिती यांनी आठ लाखाची तरतुद उपलब्ध करून दिली. सन २००४-२००५ मध्ये अंदाजपत्रकात ३.७३ लाखाची मोजक्या बाबी समाविष्ट करून ७०० चौ.मी. चे क्षेत्र आहे. हा वाहतुक बेट चांगल्या पध्दतीने विकसीत करावे. असा आग्रह धरण्यात आला त्यावेळेस सर्वांची मान्यता होती.

श्री.बैनाडे कवंरसिंग : केलेला खुलासा व्यवस्थित नाही. कोकणवाडी -रेल्वेस्टेशन बाकी शहर नाही का? अधिकाऱ्यांना एवढेच दिसते का?

श्री.जगीरदार अजीज : आजही कोकणवाडी ते रेल्वेस्टेशन एक फुट रस्ता बरोबर नाही. पायी चालता येत नाही. अडीच कोटी रूपये रस्त्याची कामे कुठे केली. मा.विभागीय आयुक्त मार्फत चौकशी करावी. कागदावरच रोड आहे. गाडी घेवून गेले तर आर्धा तास लागतो. वृत्तपत्रात बातमी आलेली आहे.

श्री.वैद्य रेणुकादास : शहरातील अतीशय चांगला चौक झाला. वेळोवेळी आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या. मागच्या स्थायी समितीची मान्यता होती. सर्व स.पदाधिकारी यांनी आदेश दिलेले होते. विरोध न करता मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती : मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी वाहतूक बेटाचे सौंदर्यीकरणाचे अतिरिक्त बाबीसाठी सौंदर्यीकरणाच्या कामा अंतर्गत असलेल्या रू.३,७०,०४०/- च्या अतिरिक्त बाबीसह (एैीर खींशाी) मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास तसेच या कामाचे रू.७,४३,४५३/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५६ :</u>**

(दि.२४-८-२००५ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ४५)

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की,ज्योतीनगर येथे १५ लाख लिटर्स क्षमतेचा आर.सी.सी.जलकुंभ बांधून मुख्य वितरण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठीचे मुळ

अंदाजपत्रक रक्कम रूपये १,२२,६४,५२७/- एवढ्याचे तयार केलेले होते. त्याप्रमाणे कामास मान्यता घेऊन कामास सुरूवात करण्यात आली.

प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी नकाशात सुचविलेल्या तांत्रिक बदलानुसार तसेच सदरील बाबी निविदा कक्षेच्या बाहेर असल्यामुळे व तांत्रिकदृष्ट्या करणे आवश्यक असल्यामुळे अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ८,२१,१६८/- एवढ्याचे महाराष्ट्र जेवन प्राधिकरणाची दरसूची सन २००४-२००५ व सार्वजनिक बांधकाम दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता अतिरिक्त बाबींचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ८,२१,१६८/- ला तसेच सदरील काम हे काम करीत असलेले ठेकेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांच्यातर्फे त्यांनी पुर्वी दिलेले दर ९% जस्तच्या ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याकरीताचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर येथे १५ लाख लिटर्स क्षमतेचा आर.सी.सी. जलकुंभ बांधून मुख्य वितरण वाहिन्या टाकण्याच्या र.रू.१,२२,६४,५२७/- च्या कामात अतिरिक्त बाबींचे रक्कम रूपये ८,२१,१६८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम हे मुळ कामाचे ठेकेदार मे.एल.के.कन्स्ट्रकशन यांच्यातर्फे त्यांनी पुर्वी दिलेले दर ९% जस्तच्या ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील गतिरोधकांकरीता फलक लावणे व थर्मोप्लास्टीक पेंटचे पट्टे मारणेसाठी मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे नुसार कामाचे सा.बां.विभागाच्या दरसूची सन २००४-२००५ च्या आधारे रक्कम रू.१०,३७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. मा.आयुक्तांनी स्थायी समितीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याची शिफारस केली आहे. करीता अं.प.र.रू.१०,३७,५००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.दलाल लता : पोलीस विभागाकडून सूचना केल्याप्रमाणे गतीरोधक काढण्यांत आले, गतीरोधक कोणत्या ठिकाणी ठेवणे व कोणत्या ठिकाणचे ठेवणे याबद्दल खुलासा होत नाही. ज्या ठिकाणी अपघाताची दाट शक्यता आहे. त्या ठिकाणचे गतीरोधक काढण्यात यावे. याबद्दलचे निकष काय आहे.

मा.आयुक्त : ज्या गतीरोधकासाठी पोलीस विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नाही आणि इंडियन रोड काँग्रेस च्या निकषाप्रमाणे नाहीत ते काढण्यात आले परंतु १००% काढलेले नाही.

श्री.जगीरदार अजीज : मंजूर करण्यांत यावे.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील गतिरोधकांकरीता फलक लावणे व थर्मोप्लास्टीक पेंटचे पट्टे मारणेसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१०,३७,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर कला आहे की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६६२/४ दिनांक ३०.९.२००२ नुसार जे प्रभाग समिती सभापती मनपाच्या कार ऐवजी स्वत:चे

किंवा खाजगी वाहन कार्यालयीन कामासाठी वापरतील त्यांना दरमहा रू.१०,०००/- रक्कम कारच्या खर्चापोटी देण्यात येत आहे. इंधनाच्या किंमतीमध्ये वारंवार वाढ झाल्यामुळे १०,०००/- प्रतिमाह ऐवजी रू.१२,५००/- प्रतिमाह खर्च देण्यासाठी मा.आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. तरी सर्व प्रभाग समिती सभापती तसेच महिला व बालकल्याण समिती सभापती यांना कार्यालयीन कामासाठी त्यांचे खाजगी वाहन वापरण्याच्या खर्चापोटी रूपये १०,०००/- प्रतिमाह ऐवजी रूपये १२,५००/- प्रतिमाह प्रमाणे खर्च ऑगस्ट २००५ पासून देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व प्रभाग समिती सभापती तसेच महिला व बालकल्याण समिती सभापती यांना कार्यालयीन कामासाठी त्यांचे खाजगी वाहन वापरण्याच्या खर्चापोटी रूपये १०,०००/- प्रतिमाह ऐवजी रूपये १२,५००/- प्रतिमाह प्रमाणे खर्च ऑगस्ट २००५ पासून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच काही महत्वाचे विकास योजना रस्ते Deferred Payment व इतर धर्तीवर विकसित करण्ययासाठी PMC (Project Management Consultancy) ची निवड करणे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) च्या धर्तीवर PMC ची नेमणूक करण्याचे प्रयोजन असुन MSRDC ने नेमलेले झचउ चे प्राप्त दर अंदाजपत्रकीय रक्कमेवर १% (एक टक्का) असुन यामध्ये PMC कडून रस्त्याचे सर्वेक्षण करणे, रस्त्याचे Cross d longitudinal Section काढणे संबंधीत IRC व IS किंवा तत्सम कोडप्रमाणे रस्त्याचे डिझाईन करणे, रहदारी घनता काढणे, कामाचे स्पेसीफिकेशन देणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

PMC कडून उपरोक्त कामे करून घेतल्यानंतर व निवेदा प्रक्रियेनंतर व कॉन्ट्रॅक्टर ची नेमणूक व प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर काम चालू असतांना, मानकाप्रमाणे काम करून घेण्यासाठी आवश्यक त्या चाचण्या घेणे, तसेच वेळोवेळी कामाची पाहणी करून कामाचा दर्ज व गुणवत्ता राखुन काम करून घेणे, Working Drawing तयार करणे व काम करतांना पुरविणे, कॉन्ट्रॅक्टरने सादर केलेले बील तपासुन सादर करणे, निवेदीतील अटी व शर्तीनुसार काम करून घेणे, नियमितपणे कॉन्ट्रॅक्टरने केलेल्या कामाचा प्रगती अहवाल देणे, काम चालू असतांना काही अडचणी आल्यास समन्वयक म्हणून काम करणे. कामाचा दर्ज तपासुन प्रमाणित करणे, या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेवर १.५०% (दिड टक्का) एवढी फीस झचउ ला देण्यात येते.

तरी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (चडठऊ) च्या धर्तीवर प्रत्येक झचउ ची नेमणूक वरील परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या दराप्रमाणे करण्याकरीता तसेच चडठऊ च्या प्रमाणे किंवा तत्सम बदल करून झचउ ची निवड करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने जेथे जेथे काम केलेले आहे तेथील सर्व कामे अर्धवट अवस्थेत आहेत. बाबा पेट्रोल पंप ते रेल्वे उड्डाण पुलापर्यंतच्या रस्त्याचे काम एमएसआरडीसीने केले. पदमपुरा येथील पुलाची अवस्था अशी आहे की नागरीकांच्या घरात शिरते. याकडे लक्ष द्यावे.

मा. आयुक्त : रस्त्यांची क्वॉलीटी चांगली असावी त्यासाठी डिझाईन तयार करावे लागेल. भविष्यात रस्ता खोदण्याची गरज भासू नये म्हणून पी.एम.सी. नेमण्यात येईल. त्यासाठी अंदाजपत्रकीय रकमेवर २.५% एवढा खर्च अपेक्षीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : डेमो घेतला मला माहित नाही. प्रशासनातर्फे माहिती द्यावी.

मा. सभापती : काल मा.महापौरांचे आदेशान्वये डेमो घेतला. प्रशासनातर्फे दाखवण्यात येईल तेव्हा सर्वांना बोलावू. मा.महापौरांनी केले आहे प्रोटोकॉल प्रमाणे बरोबर समजून यावर चर्चा करू नये. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच काही महत्वाचे विकास योजना रस्ते Deferred Payment व इतर धर्तीवर विकसित करण्ययासाठी PMC (Project Management Consultancy) ची निवड करण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (MSRDC) च्या धर्तीवर प्रत्येक PMC ची नेमणूक करण्याकरीता तसेच MSRDC च्या प्रमाणे किंवा तत्सम बदल करून PMC ची निवड करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

श्री.कंवरसिंग बैनाडे : जेअधिकारी खरोखर काम करतात त्यांचे अभिनंदन करावे. मी लाईटचे काम सांगितले ते त्वरीत झाले. मी वैयक्तिक अभिनंदन करतो.

मा. सभापती : अतिरिक्त शहर अभियंता यांना सूचना करण्यात येते की, गणरायाचे आगमन झालेले आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या रस्त्यावर रात्री १०.३० ते ७ पर्यंत दुरूस्तीचे काम करण्यात यावे व ते त्वरीत पूर्ण करावे. अडचण उद्‌भवू न देता मुख्य विसर्जन मिरवणुकीच्या रस्त्यावर तसेच वार्डातून येणारे रस्ते यावरील पूर्ण खड्डे बुजविण्यात यावेत. मी स्वत: पाहणी करणार आहे.

‘राष्ट्रगिता’नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद